विचारी माणसाला अंतर्मुख करणारे चौदा आर्त अभंग

विनवणीची वाणी

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

विनवणीची वाणी

(चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

✲ विनवणीची वाणी ✲

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

थोडे व्हावे कृपावंत

आपल्या या माणसांच्या जगात सगळेच जगत आहेत. त्यात बाहेरून पाहताना वयानुसार लहान-थोर, परिस्थितीनुसार श्रेष्ठ-कनिष्ठ, शिक्षणानुसार शिक्षित-अशिक्षित, अगदी मूलभूत म्हटलं तर स्त्री-पुरुष, धनसंपत्तीच्या दृष्टीनं पाहिलं तर गरीब-श्रीमंत, स्वभावाच्या दृष्टीनं पाहिलं तर सुष्टदुष्ट - अशा अनेक प्रकारांबरोबरच आजच्या काळात विशेष लक्षात येणारा प्रकार म्हणजे वास्तव्याच्या दृष्टीनं पूर्वी जसं खेड्यातला शहरातला असा भेद लक्षात येत होता, तसा आता देशातला आणि परदेशातला - असे अनेक प्रकार दिसून येतात.

हे सारे प्रकार बाहेरून आणि सहजपणे दिसणारे आहेत, ओळखणारे आहेत. पण खरे प्रकार-विविधता ही माणसाच्या अंतरंगात आहे आणि अर्थातच, त्यामुळं ती अशी दिसणारी नाही. एकवेळ गरीब-

श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित असे ढोबळ भेद मर्यादित आहेत आणि ते समजून घेणं त्यामानानं सोपं आहे. एखादा माणूस खूप प्रसिद्ध असणं आणि एखादा कुणाला विशेष माहीतही नसणं - हे समजणं सोपं आहे. पण अंतरंगाचे प्रकार इतके ढोबळ नाहीत. तसंच ते इतके मर्यादितही नाहीत. प्रेमळ, क्षमाशील, हळवा, नम्र, सेवाशील, जिज्ञासू , निरपेक्ष, विचारी, निरहंकार - असे माणसांचे अंतरंगात अक्षरशः अगणित प्रकार असतात. दुसऱ्या बाजूला रागीट, आग्रही, अहंकारी, ठाम, हट्टी, बेफिकीर, कृतघ्न, स्वार्थी - असेही अगणित प्रकार असतात.

वर पाहता, बाह्य जगण्याचे असे काही ठळक प्रकार असले आणि आतल्या जीवनाचे असे अगणित प्रकार असले तरी, आपल्या एक लक्षात येऊ शकेल की, माणूस म्हणून आपल्या एकूणच जगण्याचा विचार करणारे आणि त्याचा विचार न करणारे - असे दोन ढोबळ प्रकार मात्र या सबंध जगात जगणाऱ्या अगणित माणसांच्यात असलेले आपल्याला दिसतील.

कदाचित हे वाचणाऱ्यांनी पूर्वी विचार केला नसेल आणि आत्ता

या निमित्तानं केला, तरी त्यांना माणसांचे हे दोन प्रकार स्वतःपासून सुरुवात केली आणि आपल्याशी संबंधित इतर सगळ्या माणसांचा विचार केला, तरी त्यांच्यात असलेले लक्षात येऊ शकतील. त्याचबरोबर हेही लक्षात येईल की, बाकीच्या प्रकारात कितीही विविधता असली, तरी हे दोन प्रकार मूलभूत आणि महत्त्वाचे आहेत.

ते मूलभूत अशासाठी आहेत की, आपण माणूस आहोत याची जाणीव ठेवण्यात आपण जे इतर दोन प्रकार वर पाहिले उदाहरणार्थ, गरीब-श्रीमंत, रागीट-प्रेमळ या प्रकारांपेक्षा, आपण त्यादृष्टीनं कसेही असलो तरी माणूस आहोत, हे कायमच राहातं आणि माणूस असण्याची जाणीव असण्यात आपण झाडपेड, दगड, पशू यांतलं काही नाही, याची जाणीव गृहीत धरलेली आहे किंवा ती झाली असल्याचं ते लक्षण आहे. तेव्हा माणूस म्हणून जगताना माणूस असल्याची जाणीव ही खरी मूलभूत जाणीव आहे. ती असली तर पुढच्या सगळ्या आयुष्यातल्या जगण्याच्या दिशेवर ती परिणाम करू शकते. इतर कुठले भेद, गुण, अवगुण, जगण्याची प्रत

अशा कुठल्याही बाबतीवर - प्रकारावर ती जाणीव प्रभाव टाकू शकते, त्यात आवश्यक ते विधायक बदल घडवू शकते.

आपण माणूस असल्याची जाणीव असणारे आणि ती नसणारे - हे फरक इतके मूलभूत आणि महत्त्वाचे आहेत की, त्याचा अनुभव कुणीही घेऊन पहावा, असाच आहे. आत्ता म्हटल्याप्रमाणं, मी माणूस आहे याची खऱ्या अर्थानं जाणीव असलेल्यांना, दुसऱ्याशी वागताना एखाद्या दगडासारखं किंवा पशूसारखं वागणं हे शक्य होत नाही. कारण त्याची आपण माणूस असलेल्याची जाणीव मूलभूत असल्यामुळं, त्याला एखाद्या दगडाप्रमाणं दुसऱ्याच्या दुःखाबद्दल तटस्थ किंवा बेफिकीर राहता येत नाही. दुसऱ्यावर एखादा दुःखाचा प्रसंग असेल, तो तळमळत असेल, तर समोरचा एखादा दगड, पशू हा जिथं आहे, तिथंच राहील. त्याची प्रतिक्रिया होणार नाही. त्याविषयी तो उपेक्षाही करणार नाही आणि मदतीला पुढंही होणार नाही.

पण माणूस असण्याची जाणीव असल्याचा मूलभूत फरक

मात्र आपल्याला असं राहू देणार नाही. आपण किती आणि काय करू शकू, याला जरूर मर्यादा असू शकतील. कदाचित, त्यावेळेचं आवश्यक ते सगळं आपण करूही शकू - सहानुभूती दाखवू, मदत करू, धावून जाऊ, इतरांना बोलावू. पण हे सगळं शक्य आहे ते आपण माणूस आहोत, या जाणिवेत आहे. हे अर्थातच स्पष्ट आहे की, आपण माणूस असण्याची जाणीव हे नुसतं बौद्धिकदृष्ट्या कळलेलं असून उपयोग नाही, हे गृहीत धरलेलं आहे. माणूस असण्याची जाणीव असणं म्हणजेच, जी प्रतिक्रिया मनुष्याव्यतिरिक्त इतर जड किंवा चेतन वस्तू देऊ शकणार नाहीत, ती आपण देऊ शकणं, निदान त्याबद्दलचे विचार आपल्या मनात येणं, कृतींबद्दल पर्याय पाहाणं, हे अपेक्षित आहे.

जगात जे खरे दोन मूलभूत प्रकार म्हटले त्यांतल्या, दुसऱ्या प्रकारातला अनुभवही तितकाच स्पष्ट आणि कुणालाही घेता येण्यासारखा आहे. माणूस असल्याची जाणीव नसली, तर त्या प्रकारातला मनुष्य हा फक्त मनुष्याची आकृती धारण केलेली वस्तू ठरते. आहार - निद्रेसारख्या

जेवढ्या जगण्याच्या गरजा आहेत, तेवढ्या पशूंप्रमाणं कधीही कोणत्याही मार्गानं पुऱ्या करणं, बाकीच्या सगळ्या जवळच्या-दूरच्या माणसांविषयी उदासीन असणं, आपल्या गरजा भागताच सुस्तावून आळसात झोपी जाणं - यापलीकडं त्याच्या आयुष्यात फारसं काही घडताना आपल्याला दिसणार नाही. त्याच्याशी संबंधित असलेल्या इतर माणसांनासुद्धा त्याच्याकडून यापलीकडं कुठल्या अपेक्षा बाळगता येत नाहीत, बाळगल्याच तर त्या फोल ठरतात.

या सगळ्याचा इथं विचार करण्याचं कारण असं की, एकदा आपण माणूस म्हणून जगतो याची जाणीव असली, तर मनुष्याची स्वतःचीच दिशा विधायक होते इतकंच नव्हे तर, तो ज्या ठिकाणी वावरतो, तो माणसांचा समूह सुसंस्कृत होतो, प्रगत होतो. त्या प्रकारच्या माणसांच्यात दैवी गुणांचा विकास शक्य असतो, स्वास्थ्य आणि समाधान नांदण्याच्या शक्यता संभवतात. पण जर हीच मूलभूत जाणीव नसेल, तर अपरिमित स्वार्थ, त्यापोटीची पशूंच्या जीवनात आढळणारी वणवण - रखरख आणि गरजा

भागल्यानंतरचं निरुद्देश्य, निद्रिस्त जीवन एवढंच आढळेल. ते जीवन भोगवादी तर असेलच पण जागं असलं की, अस्वास्थ्याचं आणि निद्रिस्त असलं की, प्रगतीच्या बाबतीत निरुपयोगी - असं असल्याचं आढळून येईल. यातली निकृष्टता स्पष्ट आहे.

आता जर माणूस असंवेदनशील असेल, त्याला फक्त स्वतःच्या अशा पशूवत प्राथमिक गरजांपुरतीच चिंता असेल, तर त्याला या फरकाचं महत्त्वही वाटणार नाही, त्यावर विचार करावासाही वाटणार नाही, काही करणं तर दूरच राहिलं. पण कुठल्या ना कुठल्या निमित्तानं तो जागृत झाला, तर भले त्याचं जीवन आजवर माणूसपणाची जाणीव नसणारं आणि त्यामुळं तशा पद्धतीचं निकृष्ट जीवन असेल, पण ते बदलण्याची क्षमता त्याच्यात आहे आणि तो ती वापरू शकतो.

ज्यांच्यात माणूसपणाची जाणीव आधीच आहे, त्यांच्या जगण्यात त्यांच्या प्रयत्नांना येणारं यशापयश कितीही असेल, ते लोक आधीच जागृत असल्यामुळं ते स्वास्थ्याच्या दिशेनं प्रवासात आहेत. तो स्वास्थ्याचा

प्रवास पूर्ण होताना ते, याचि देही याचि डोळा, देवत्वाचा प्रवास पुरा करणार, यात शंका नाही.

मला या सगळ्याची प्रत्यक्ष जगताना जाणीव झाल्यावर, हा प्रवास करून येणाऱ्या सार्थकाचं दर्शन झाल्यावर, आता पुन्हा आपल्याकडून इतर इतक्या प्रकारानं सार्थकाविषयी सांगून झालं आहे, पण अगदी शेवटच्या क्षणी जे प्रसंगानं शब्दबद्ध करावंसं वाटलं, आर्ततेनं आणि तितक्यात नम्रपणे सांगावसं वाटलं, ते व्यक्त करणारे, त्या अर्थानं अखेरचा प्रयत्न म्हणून हे चौदा अभंग लिहिलेले आहेत. त्यांत मनुष्य म्हणून सावध नसणाऱ्यांनी सावध व्हावं, त्यांना ध्येयाची जाणीव व्हावी, या आर्ततेपोटी केलेली विनवणी आहेच. पण जे सावधानतेनं प्रयत्न करताहेत, त्यांच्या प्रयत्नांना संतमार्गाची दिशा आणि मदत व्हावी, हाही निरपेक्ष उद्देश आहे. या दोनही प्रकारच्या व्यक्तींना आपापल्या मार्गात आयुष्य सफल करायला, इतरांना आपल्याकडून होऊ शकणारी मदत करायला आणि साफल्याचं-देवत्वाचं-जीवाच्या अंतिम मुक्तीचं ध्येय गाठायला मदत व्हावी, यासाठी या सर्वांना

या अभंगवाणीतली ही आर्त विनवणी आहे. आपापल्या गडबडीच्या, धावपळीच्या प्रपंचातून वेळ काढून, क्षणभरासाठी आधी आपले अनुभव-विचार-मतं बाजूला ठेवून, थोडं कृपावंत होऊन, या बाळवचनांचा विचार करावा आणि मग आपल्या अनुभवाशी हे सारं ताडून पाहून, त्यातलं काही स्वीकारण्यासारखं असेल तर ते घ्यावं, ही प्रार्थना.

त्यांच्या कल्याणाच्या मार्गात या शब्दांकनाची अल्पशी मदत झाली तरी ते भाग्य समजतो आणि परमात्म्याची कृपा मानतो.

पुस्तिकेच्या रूपानं आणि सोबतच्या ऑडिओ सीडीच्या रूपानं चिंतन आणि नित्यपाठासाठी, हे जिज्ञासूंपर्यंत पोचवणाऱ्या सर्वांचा मी ऋणी आहे.

संतछाया,
संतनगरी, सातारा

- सुहास पेठे

विनवणी : विषयसूचिका

१. पटता मानावे प्रमाण / १५

२. पुन्हा जन्मा यावे त्याने /१७

३. अपुली आपण सुटका करा /१९

४. ज्यात नाही कुठली बाधा / २१

५. पहा उरती का सोबती / २३

६. कधी थांबेल हा धंदा / २५

७. जुने सारे पूर्ण करा / २७

८. संतवचनी होते काम / २९
९. हाती येता सुटते गणित / ३१
१०. संत करावे सोयरे / ३३
११. संतपायी शिकता येते / ३५
१२. त्यास नाही जन्ममरण / ३७
१३. थोडे करूनिया पाहे / ३९
१४. व्हावे सर्वांचे कल्याण / ४१

॥ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ॥

* १ *

लौकिक गोष्टींनी श्रेष्ठ असलेली माणसं सहसा इतरांचा अनुभव किंवा मत ऐकायला विशेषतः त्याचा विचार करायला सहज अनुकूल नसतात. सत्ता, मान, धन, शिक्षण - अशा अनेक अनुकूलतांपुढं, त्यांना आपलं जगणं मनुष्य म्हणून सावधानतेचं आहे किंवा नाही, याचा विचार करण्याची अनेकदा गरज वाटत नाही किंबहुना तशी शंकाही येत नाही. म्हणून त्यांना आणि इतर सर्वांनाही पहिल्या अभंगात विनंती केली आहे की, आपण सर्व बाबतीत श्रेष्ठ आहात, तरीही कृपा करून, यापुढं दिलेल्या अनुभवांचा विचार करावा आणि आपण सज्ञन आहात, तेव्हा निदान या अभंगातला विचार पटला, अनुभवायला आला, तर तो स्वीकारावा.

।।१।। पटता मानावे प्रमाण...

माझी विनवणीची वाणी ।
तुम्ही ऐकावी सज्ञनी ।।१।।
थोडे व्हावे कृपावंत ।
बाळवचनी देण्या चित्त ।।२।।
वय अनुभव थोर ।
श्रेष्ठ आपुला अधिकार ।।३।।
धन, मान अपुली सत्ता ।
मी तो कणही ना पुरता ।।४।।
दीन बोले तरि हे वचन ।
पटता मानावे प्रमाण ।।५।।

* २ *

मनुष्याचा देह मिळणं याची जाणीव असणारे लोक कमी असतात, असं जे प्रास्ताविकात म्हटलं, त्याचा अनुभव आपल्याला बाहेरच्या जगात अवश्य येईल. ज्या सत्ता किंवा शक्ती आपल्याला अनुकूल आहेत, आपल्या ताब्यात आहेत, असं आपण समजतो, त्या इतक्या खात्रीच्या तर नाहीतच, पण वेळप्रसंगी अनेकदा तकलादू ठरतात. देह धारण करण्यापासून आयुष्यात काय करावं, कुणाची भेटगाठ व्हावी, कोणती स्थिती आपल्या वाट्याला यावी, याबाबतीत आपण स्वाधीन असल्यापेक्षा पराधीनच जास्त आहोत, याची जाणीव झाली, तर आपण अनेक बंधनांतच जगतो आहोत, हे कळेल. ते कळणाऱ्यांनी असं का आहे, याचा शोध घ्यावा आणि पुन्हा पुन्हा निर्माण होणारी ही पराधीन स्थिती दूर करण्यासाठी हे जीवन वापरावं.

॥२॥ पुन्हा जन्मा यावे त्याने...

देह धरणे का हो लागे ।
काळ का लागे हो मागे ? ॥१॥
मायबाप नाही हाती ।
पराधीन अवघे होती ॥२॥
भेट, गाठ, स्थिती याला ।
जीव जन्माने बांधला ॥३॥
अवघ्या बंधांचे कारण ।
कोणी काढावे शोधून ॥४॥
दीन म्हणे हे ना करणे ।
पुन्हा जन्मा यावे त्याने ॥५॥

* ३ *

कुणाकडून काही घेतल्याशिवाय जगणं, हा पर्याय कुणाला निरुपद्रवी वाटला किंवा योग्य वाटला, तरी तो व्यवहारात शक्य नाही. पोटपाण्याच्या उद्योगापासून, आपल्या अखेरच्या क्षणापर्यंत जगाकडून जसं काही स्वीकारीत राहावं लागणार, तसं जगाला काही देतही राहावं लागणार. हे दोन्ही व्यवहार अर्थातच कधी समान नसतात. त्यामुळं त्यातून एकमेकांचं देणघेणं निर्माण होतं. कितीही ठरवलं आणि सावध राहिलं, तरीही या देण्याघेण्यातून पूर्णपणे मुक्त होणं, हे कुठल्याच कृतींनी शक्य नाही. असं असेल, तर आपण या देण्या-घेण्याच्या बंधनात कायमच अडकलेले राहणार. निसर्गनियमाप्रमाणं याच नव्हे तर पुढच्या जन्मातही. ज्याला यातून खऱ्या अर्थानं मुक्त व्हायचं आहे, त्याला स्वतःच्या सुटकेसाठी काही वेगळे प्रयत्न करावे लागतील.

॥३॥ अपुली आपण सुटका करा...

ज्यांनी पोटास घालावे ।
त्यांचे दास लागे व्हावे ॥१॥
ज्यांनी दाखविली माया ।
त्यांना द्यावी लागे काया ॥२॥
कोणाचे ना काही घ्यावे ।
कैसे जीवन चालावे ? ॥३॥
देणे चुकवूनी जगावे ।
ओझे वाढते स्वभावे ॥४॥
दीन म्हणे काही करा ।
अपुली आपण सुटका करा ॥५॥

असा मुक्तीचा विचार किंवा प्रयत्न लोक करीत नाहीत, असं नाही. ते तो करतात. त्यासाठी वेगवेगळे मार्गही काढतात. काहींची कल्पना आपण आपला स्वधर्म सांभाळून, कर्मांची शुद्धता राखून यातून सुटू, पण जरा बेसावध राहिलं तर, तिथं अहंकार निर्माण होऊन मनुष्य बंधनात पडतो. अनेकांचा वेगवेगळ्या प्रकारच्या सेवेवर भर असतो. सेवेनं आपण मुक्त होऊ असं वाटतं, पण कुठल्याही बेसावध क्षणी, कधी त्याबद्दल मानमान्यता मिळते, जीव सुखावतो, कधी उपेक्षा पदरी येते आणि जीव दुखावतो. अर्थातच, पुन्हा सुखदुःखाची बंधनं तशीच राहतात. अगदी संपर्क तोडून राहायचा प्रयत्न केला तरी प्रसंगानं इतर कुणाचा तरी प्रपंच, त्यात मदत करायची वेळ येते आणि त्यात मनुष्य अडकतो. म्हणून निर्दोष मार्ग शोधणं, हे खरं काम आहे !

।।४।। ज्यात नाही कुठली बाधा...

ज्याला वाटे करीन कर्म ।
सांभाळीन अवघा धर्म ।।१।।
त्याला गाठी अहंकार ।
बांधणारा चोर थोर ।।२।।
समाजाची सेवा करता ।
मानउपेक्षा ये हाता ।।३।।
वाढवावे ना गणगोत ।
परके येतसे गळ्यात ।।४।।
दीन म्हणे मार्ग शोधा ।
ज्यात नाही कुठली बाधा ।।५।।

* ५ *

काहींना जगण्याबद्दल असा विचार करणं, त्याबाबतीत सावध राहाणं, असे मुक्ततेचे मार्ग शोधणं - असल्या गोष्टी या नुसत्या अकारण कष्टाच्याच नव्हेत तर, अनावश्यकही वाटतात. त्यांच्या दृष्टीनं आपल्याला एवढा छान देह मिळाला आहे, अनुकूलता आहे, हौसमौज आहे, तर खावं-प्यावं-हिंडावं, कार्यक्रम-समारंभ अशा गोष्टींत रंगून आयुष्य काढावं, असं वाटतं. अनेक विचार करून डोकं शिणवून घेण्यापेक्षा, हा मार्ग त्यांना सोपा, आकर्षक वाटतो. पण क्षणभर अनुभव पाहावा की, हे सारं ज्यावर अवलंबून आहे, तो मुख्यतः देह काय किंवा पैसा-प्रतिष्ठा काय, शाश्वत नाहीत, कुठल्याही क्षणी कोणत्याही कारणानं त्यात उणीव आली की, स्वतःला तर यातलं काही करता येत नाहीच, पण सारे सुखाचे सोबतीसुद्धा फिरकत नाहीसे होतात.

।।५।। पहा उरती का सोबती...

जरी रहावे बेफिकिर ।
तरी वणवण ना चुकणार ।।१।।
जरी बेसावध व्हावे ।
नक्की लागे पुन्हा यावे ।।२।।
मौजे ल्यावे, खावे, प्यावे ।
देह थकता दीन व्हावे ।।३।।
पैसा, प्रतिष्ठा तोवर ।
पाहुण्यांची येरझार ।।४।।
दीन म्हणे दाणे नुरती ।
पहा उरती का सोबती ।।५।।

आयुष्यात रोज प्रत्येकाचा अनेकांशी वेगवेगळ्या कारणानं व्यवहार सुरू आहे. कुणी देतो आहे, कुणी घेतो आहे. कुणाला त्यात फायदा होतो आहे, कुणाला झळ लागताना दिसते आहे. कुणी अचानकपणे आयुष्यात येतं आहे. ते कधी आपल्याला काही अकारण देऊन जातं आहे, तर कधी आपलं काही घेऊन जातं आहे. आयुष्याची एवढी मोठी उलाढाल चालत असून, ती आपल्या हातात नसूनही अनेकदा ती तशी का आहे, माझा या लोकांशी संबंध का आला, मला कुणाला काही गोष्टी का द्याव्या लागतात, काही लोक मला त्या का देतात - असे खरंतर साधे पण महत्त्वाचे प्रश्न बुद्धिमंतांनाही पडत नाहीत, हे आश्चर्य आहे. जर हे प्रश्न पडतील, तर स्वाभाविकपणे ही उलाढाल यशस्वीपणे कशी थांबवता येईल, ते शोधलं जाईल.

।।६।। कधी थांबेल हा धंदा...

कोणी करी ना विचार ।
कसा आलो येथवर ।।१।।
प्रारब्धाचे चाले खाते ।
अवघे जमती घेते-दाते ।।२।।
वाटे आपण करितो सारे ।
प्रसंग येता कळते खरे ।।३।।
म्हणुनी त्यात ना अडकावे ।
हिशेब पुरते होऊ द्यावे ।।४।।
दीन म्हणे आता शोधा ।
कधी थांबेल हा धंदा ।।५।।

* ७ *

ज्यांना जगात आपल्या चाललेल्या व्यवहाराचं भान येतं, त्यातली सक्तीही लक्षात येते आणि संधीही लक्षात येते, ते लोक भाग्यवान होत. त्यांना अधिक सावधपणे जगता येतं. त्यांना अस्वस्थता येत नाही, चित्ताचे भार कमी करता येतात. प्रारब्ध, कर्मं, त्यातलं स्वातंत्र्य या साऱ्यांचं वर्म लक्षात आल्यानं प्रारब्ध कसं संपवावं, आत्ताचं कर्म करताना ते कौशल्यानं कसं करावं, कर्तृत्वाच्या अभिमानापासून दूर कसं राहावं- अशा जगण्यातल्या साऱ्या खुबी लक्षात येतात. आज जगताना तर ते तणावरहित जगू शकतातच, पण पुढंही त्यांच्या वाट्याला तणावही राहात नाहीत आणि कर्मांचे परिणामही राहात नाहीत. सावध जगण्याचं हे मर्म ज्यांना सापडतं, ते आत्ताची कर्मं जाणीवपूर्वक करतात आणि जुनी पूर्ण करून हलके होतात.

।।७।। जुने सारे पूर्ण करा...

बाकी मागील चुकवावी ।
कोठे काही न ठेवावी ।।१।।
नव्या कर्तृत्वाचा भार ।
नका घेऊ अपुल्यावर ।।२।।
करो प्रारब्ध व्यवहार ।
उभे आपण दूरवर ।।३।।
त्याला सापडेल वर्म ।
कसे जगावे उत्तम ।।४।।
दीन म्हणे हलके करा ।
जुने सारे पूर्ण करा ।।५।।

* ८ *

जो सावध राहून विचार करील त्याच्या हे लक्षात येईल की, परिस्थिती कोणतीही असली, मनुष्य गरीब-श्रीमंत, रोगी-निरोगी, एकटा-दुकटा कसाही असला, तरी त्यानुसार त्याला या जगाची बंधनं स्वीकारणं कमीजास्त होत नाही. प्रारब्धानं देह आला, प्रारब्धाप्रमाणं कर्म करावी लागली, देणघेणं करावं लागलं, तरी ते ज्याच्या साहाय्यानं करतो, त्या प्रारब्धाचं दास्यत्व असलं तरी, देहाचं दास्यत्व केलंच पाहिजे, असं त्याच्यावर बंधन नाही ! देह त्याच्या नियमाप्रमाणं, स्थितीप्रमाणं राहायचा तसा राहील, त्यात एका देहापेक्षा दुसरा देह वेगळाही असेल, पण त्या सर्वांच्या ठिकाणी नांदणारा भगवंत सर्वांच्या देहात सारखाच आहे आणि तो पूर्ण स्वतंत्र आहे,मुक्त आहे. तो जागृत कसा राहील, हे आपलं खरं काम आहे. संत तेच लक्षात आणून देतात.

॥८॥ संतवचनी होते काम...

जरी देह प्रारब्धाचा ।
दास न लागे व्हावे त्याचा ॥१॥
देही मालक जागृत राहे ।
त्याला सोपे सारे आहे ॥२॥
मूळ चैतन्य तो प्राण ।
देही नांदे नारायण ॥३॥
त्याचे आपण कैसे व्हावे ।
तेच लागते जाणावे ॥४॥
दीन म्हणे त्याचे वर्म ।
संतवचनी होते काम ॥५॥

* ९ *

सामान्य माणसाला देह असतो, त्याला प्रारब्ध लागू होतं, नवी कर्मं करायचं स्वातंत्र्य असतं - हे जसं आपण पाहिलं, स्वतः अनुभवतो- खरंतर संतांच्या बाबतीतही सारं तसंच असतं. त्यांनाही असंच देहात यावं लागतं, प्रारब्धं पुरी करावी लागतात. पण आपण एक सामान्य जीव म्हणून येतो आणि तसेच जीव म्हणून जातो. ते मात्र जीव म्हणून येतात आणि संत म्हणून - देव म्हणून जातात. असा फरक का पडतो, हाच खरा विचार करण्याचा विषय आहे. जगातले विषय शिकून याची उत्तर मिळत नाहीत. संत देह ठेवूनही आज अनुभव देऊ शकतात. या साऱ्याची कारणं त्यांच्या जीवन जगण्याच्या रीतीमध्ये असतात, सावधानतेत असतात, योग्य कर्मांत असतात. ती रीत कळली तर, मग हे जीवनाचं गणित सुटू शकतं.

।।९।। हाती येता सुटते गणित...

संतांअंगी थोरपण ।
येत नाही अकारण ।।१।।
तेही देहात येतात ।
पुरी प्रारब्धे करतात ।।२।।
परी कालातीत होती ।
जना बोधूनीया रीती ।।३।।
नित्य सावध होती चित्ती ।
वरी योग्य कर्मे करिती ।।४।।
दीन म्हणे संतरीत ।
हाती येता सुटते गणित ।।५।।

सामान्य माणसांच्या आणि संतांच्या जगण्यातले एकएक फरक लक्षात आले की, त्यांच्या थोरपणाची थोडीशी का होईना, कल्पना येऊ लागते. त्यांचं जीवन अनेक अर्थांनी यशस्वी का होतं, याचा उलगडा होऊ लागतो. आपल्यासारख्याच प्रपंचाची, कर्मांची, माणसांची, परिस्थितीची-त्यांची अवस्था असतानासुद्धा ते त्यातच राहून कोणत्या कौशल्यानं आपल्या प्रारब्धाचा अंत करतात, कर्मांचं कर्तव्यात रूपांतर करतात, त्यापासून अलिप्त राहातात, अंतरंग कसं पालटतात, इतकंच काय, ज्या देवांकडून आपण प्रेरणा घेतो, त्यांचीसुद्धा संस्थापना ते आपल्या आयुष्यात कशी करतात, त्यांना जिवंतपण कसं आणतात-अशा अनेक गोष्टींचा उलगडा आपल्याला होऊ शकतो, हे जाणून घेण्यासाठी संतच आपले खरे नातेवाईक समजावेत.

॥१०॥ संत करावे सोयरे...

म्हणुनी संतांचे महिमान ।
देव देती त्यांना मान ॥१॥
तेचि देव संस्थापिती ।
सगुण साक्षात करवीती ॥२॥
कसे कर्तव्य करावे ।
कसे अंतर बदलावे ॥३॥
काळावरती करिती मात ।
करिती प्रारब्धाचा अंत ॥४॥
दीन म्हणे जाणा त्वरे ।
संत करावे सोयरे ॥५॥

* ११ *

अत्यंत शांतपणे सर्वांबरोबर जगत असतानाही संतांच्या बाह्य आणि आंतरिक जगण्याचा स्तर किती विलक्षण उच्च असतो, याची कल्पना बारीक अभ्यास करणाऱ्यालाच येईल. सावधानतेनं पाहाणाऱ्याच येईल. आपण देहाच्या स्वाधीन असतो-ते देह कारणी लावतात, आपण देहाचे दास होतो-ते देहाचे स्वामी होतात, कष्ट करून स्वतःचं हित साधणंसुद्धा आपल्याला अवघड जातं, तर त्यांच्या ठिकाणच्या भगवंताच्या बळकट अनुसंधानानं आणि त्यागी कल्याणकारक वृत्तीमुळं ते फिरले किंवा नुसते बसले तरी, ते जाताजाता जगाचं हित करून जातात. आपल्याला लक्षात ठेवायला सांगूनही भान राहात नाही आणि त्यांचं कर्तव्याचं भान कधी जात नाही, नाम कधी सुटत नाही. या आणि अशा युक्ती संतपायी शिकाव्यात.

॥११॥ संतपायी शिकता येते...

सोपे नामाचे साधन ।
त्यांत कर्तव्यांचे भान ॥१॥
देह कारणी लावावे ।
सर्व संतांनी शिकवावे ॥२॥
स्वामी देहाचे होऊनी ।
व्हावे ज्ञानी वा विज्ञानी ॥३॥
संत फिरती अथवा बसती ।
हित जगाचे साधती ॥४॥
दीन म्हणे अवघ्या युक्ती ।
संतपायी शिकता येती ॥५॥

जग इतकं विशाल आहे, मायेचा पगडा एवढा विलक्षण आहे, विज्ञानाची प्रगती इतकी झपाट्यानं होते आहे, त्यामुळं माणसाला देहाच्या सुखाच्या साधनांची उपलब्धता इतकी वाढते आहे की, हे सारं आपल्या कल्पनेपलीकडचं आहे. अनेक ठिकाणी तर अतोनात पैसा आणि उपभोग यांची देशोदेशी रेलचेल आहे. अगदी निसर्गनियम लक्षात घेतला, तरी माणसाला या साऱ्या समृद्धीपासून फायदा तर झाला नाहीच, उलट त्याच्या वाट्याला असंख्य दुःख, तणाव, रोग, स्पर्धा-अशा अनेक अस्वास्थ्याच्या गोष्टी आल्या आहेत. संतांचा मार्ग मध्यम आहे. जिथवर गरज आहे तिथवर जगाप्रमाणं वागावं, पण जिथं स्वातंत्र्य आहे, तिथं संयमी आणि स्थिर असावं. त्यानंच स्वास्थ्य येईल. संतांना शरण जाऊन हा मार्ग शिकता येईल.

॥१२॥ त्यास नाही जन्ममरण...

काळ जातो जैसा पुढती ।
सुखसाधने वाढती ॥१॥
पैसाभोगांची ही भूल ।
दु:ख, अस्वास्थ्य देईल ॥२॥
कळे त्याने सावध व्हावे ।
मायाबाजार जोखावे ॥३॥
जगचालीने वर्तावे ।
स्थिर अंतरी असावे ॥४॥
दीन म्हणे संतां शरण ।
त्यास नाही जन्ममरण ॥५॥

* १३ *

जे लोक थोडेफार सावध होतात, जगाची बेदरकार, आंधळी, भोगवादी जीवनपद्धत आपल्याला दुःखात लोटणार, हे ज्यांच्या लक्षात येतं, त्यांना यातून सुटण्याची रीत शिकण्यासाठी जणु संतांना जन्माला घातलं आहे. आपल्याबरोबर ठेवलं आहे आणि खऱ्या जीवनाकडं जाण्यासाठी लागणाऱ्या गुणांचं प्रात्यक्षिक, त्यांच्या रूपानं परमेश्वरच आपल्यासमोर ठेवतो आहे. संतांचं जीवन एखाद्या लोकगंगेसारखं अशा सावध-बेसावध लोकांवर उपकार करण्यासाठी आहे. त्यात कुठला भेदभाव नाही, आपलं परकं नाही. व्यवहार सांभाळून, कौटुंबिक-ऐहिक सौख्य सांभाळून मुक्त कसं व्हावं, हे ते जगतात आणि त्याची रीतही शिकवतात. असा विचार करणं, जगणं, शिकणं-हे वाटतं एवढं कठीण नाही. प्रत्यक्ष जगण्यानंच त्याचा सोपेपणा कळेल.

॥१३॥ थोडे करूनिया पाहे...

सोपी संतांची या रीत ।
नाम ठेवावे चित्तात ॥१॥
देह स्वधर्मी ठेवावा ।
लोकव्यवहार राखावा ॥२॥
योग्य ऐहिक सांभाळावे ।
बंधमुक्त तेणे व्हावे ॥३॥
जातपात नाही यात ।
एक सर्व या मार्गात ॥४॥
दीन म्हणे सोपे आहे ।
थोडे करूनिया पाहे ॥५॥

काही लोकांना मुक्त होण्याच्या संतांच्या या मार्गाचा आपल्याला परिचय नाही, हे कबूल असतं. करून घ्यावा, अशी इच्छाही असते. त्यासाठी संतांना शरण जाण्याची, त्यांचं आज्ञापालन करण्याची त्यांची तयारीही असते. काहींना मात्र असं वाटतं की, आपल्या बुद्धीला जे आणि जेव्हा पटेल, तेच बरोबर आहे आणि ते आणि तेव्हाच आपण तसं वागू. वास्तविक, संतांचं सांगणं हे याही लोकांना पटेल इतकं तर्कशुद्ध जरूर असतं, फक्त ते निःस्वार्थी असल्यानं, अनाग्रही असल्यानं, एखाद्याच्या मर्यादित बुद्धीच्या कक्षेपेक्षा ते खूप विशाल असतं. आपण शरणागतीनं जावं वा बुद्धीनं जावं, पण स्वहितासाठी अनुभव घेऊन तरी विश्वास ठेवावा आणि आपलंच कल्याण करून घ्यावं, एवढीच प्रार्थना इथं हात जोडून केली आहे !

॥१४॥ व्हावे सर्वांचे कल्याण...

अंती जोडूनीया हात ।
म्हणे व्हावे कृपावंत ॥१॥
थोर आपण लक्ष द्यावे ।
स्वहित आपुले साधावे ॥२॥
वाटे बुद्धीने चालावे ।
तरी अभ्यासे पहावे ॥३॥
जरी पाहाल अनुभव ।
मग ठेवाल ना भाव ॥४॥
दीन मागे देवा दान ।
व्हावे सर्वांचे कल्याण ॥५॥

ज्या तळमळीच्या भूमिकेनं या चौदा अभंगात विनवणीची वाणी शब्दांकित झाली आहे, ती तळमळ समजून घेणं, त्यानुसार विचार करून पाहाणं, एवढी तरी आपली नित्याची गरज आहे. प्रपंचाच्या ठेवणी अनेक प्रकारच्या असतील, माणसं लहानमोठी असतील, बाह्य परिस्थितीत फरक असेल, पण यात उपस्थित केलेले मूळ प्रश्न मूलभूत आहेत, सर्वांना समान आहेत. मनुष्य बेसावध कर्मानं अडकतो आहे, त्यातल्या त्यात त्याला उपलब्ध असलेली सोपी संतरीत न शिकल्यानं, पुन्हा नव्या कर्मांनी बद्ध होतो आहे, सुखदुःख भोगतो आहे आणि पुन्हा नव्या जन्माच्या बंधनाकडं अविरत प्रवास करतो आहे. या जन्माच्या निमित्तानं मिळालेली मुक्तीची विलक्षण संधी त्याला मिळावी, यासाठी केलेली ही विनवणी अशी सर्वांसाठीच आहे.

श्री सच्चिदानंदार्पणमस्तु...

स्वतःच स्वतःला मुक्त करण्याची ही आर्त हाक या चौदा अभंगांच्या निमित्तानं व्यक्त झाली आहे, तो अनुभवही आहे आणि देवाचा प्रसादही आहे. तो सर्वांसाठी प्राप्त झालेला असल्यामुळं, जसा मिळाला तसा हा अर्घ्य प्रथम संतांना अर्पण केला आहे. नंतर ज्यांना त्याचा यथोचित उपयोग व्हावा म्हणून शब्दांकित करून ठेवला आहे - त्या सर्व लोकांच्या चरणी तो अर्पण केला आहे आणि याही कर्माचा कुठला ठसा मागे उरू नये म्हणून, शेवटी सच्चिदानंदस्वरूप परमेश्वराच्या चरणी हा अर्घ्य अर्पण केला आहे.

।। श्री संतचरणार्पणमस्तु ।।

।। श्री लोकचरणार्पणमस्तु ।।

।। श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।।

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम
२१. चिंतनक्षण (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना
३०. अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा	३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ	३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश	४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१.समओवी पारायणप्रत	४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)

५५. शिदोरी	५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २	५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २	६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी	६२. श्रद्धेची पहाट

६३. उपासनामाला

६४. पावनपथ ६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग ६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४ ७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३ ७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा ७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य ७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद ७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण ८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***

उपासनेसाठी नित्यपाठ

संतछाया
संतनगरी,सातारा